**आर.सी.सी क्र.१८५४/२०२२**

**सरकार विरुध्द. गणेश सरग**
**निशाणी क्र.२५ ची पुरवणी**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. प्रभाकर नामदेव सरग**

वय – ८४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार – मिलकॉर्नर, कोतवालपुरा, औरंगाबाद.

---

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. मंचेरिल एस.एन.**

मी पोलीस म्हणुन कार्यरत होतो. मी हे.कॉ. म्हणुन सेवानिवृत्त झालो. माझे नॉन मॅट्रीक आहे. मी मराठी माध्यमात शिक्षण घेतले आहे. Right Shoulder ला मराठी मध्ये काय म्हणतात ते मला सांगता येणार नाही. तसेच Left Shoulder मराठीत डावा खांदा असे म्हणतात. मी माझ्या नोकरीच्या कालावधीत पोलीस स्टेशनला कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर कसा केला जातो, प्रकरण कशी तयार केली जातात हे सर्व मला माहिती आहे. माझ्या नोकरीच्या कालावधीत मी कधीही निलंबित झालेलो नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी एक वेळा निलंबित झालो होतो. आरोपी कोठडीतुन पळाला होता या कारणासाठी मला एकदा निलंबित केले होते. मी सहा महिन्यासाठी निलंबित होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला एखादी जखमी व्यक्ती आला तर त्याला सरकारी दवाखान्यात पाठवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ हा माझ्या सख्या भावाचा मुलगा, आरोपी क्र.२ त्याची पत्नी व आरोपी क्र.३ त्याची आई आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या वडीलांच्या सोबत माझे पुष्कळ वर्ष मिळकतीसाठी वाद चालु होते. हे म्हणणे खरे आहे की, आर.सी.एस.क्र २५३/२०१३ एकनाथ वि. प्रभाकर हे दिवाणी प्रकरण न्यायालयात दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना हि कोतवालपुरा येथे घडलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोतवालपुरा ते घाटी हॉस्पीटल मधील अंतर रिक्षाने ५ मिनीटे लागतात. कोतवालपुरा येथील घरात मी एकटाच राहतो. हे म्हणणे खरे आहे की, कैलास पोटे यांच्या घराच्या वर असलेल्या

मेसमध्ये मी जेवण करतो. माझ्या घरासमोर पाणी साचत असल्यामुळे मी महानगरपालिकेत कधीही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला नक्की काय शिवी दिली याबाबतचा मजकुर पोलीसांनी माझ्या फिर्याद मध्ये नमुद केलेला नाही. घटना २ ते ३ मिनीटे चालली होती. घटना अंदाजे दुपारी ०१.०० वाजता सुरु झाली होती. घटनेच्या नंतर मला ०३.०० वाजता रिक्षातुन उपचाराकरिता नेले होते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, ०३.०० वाजता घटना सुरु झाली होती. मला तीन्ही आरोपींनी एकाच वेळेला सोबत विट फेकुन मारलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी शुध्द हरपली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला ०३.०० वाजता परेशिया हॉस्पीटलला नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, हॉस्पीटलला मी ०४.३० वाजता गेलो होतो. हॉस्पीटलला मी ३ दिवस ॲडमीट होतो. सदर तीन दिवसांत मी ॲडमीट असतांना बाहेर कुठेही गेलो नाही. पोलीस माझा जबाब नोंदवण्यासाठी दवाखान्यात आले होते. माझे जखमी प्रमाणपत्र व एक्सरे रिपोर्ट मी पोलीसांना दिले नाही. माझा डावा खांदा एकाच वेळेला तुटलेला आहे. नि.क्र.३२ व ३३ एक्सरे वर माझे वय ६५ व एकावर ७९ असे लिहिलेले आहे. ज्या एक्सरे वर ७९ वय आहे त्यावर दिनांक ०८.११.२०२१ असे लिहिलेले आहे. दुस–या एक्सरे वर माझे वय ६५ आहे त्यावर दिनांक २९.१०.२०२१ अशी आहे व वेळ ०४.१५ मिनीटांनी काढला असे आहे. हे मला माहिती नाही की, माझ्या एम.एल.सी. रिपोर्ट नुसार माझी तपासणी ०४.३० मिनीटांनी सुरु झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा व बनावट एक्सरे फिल्म दाखल केलेली आहे.

**(मध्यांन्हाची वेळ झाल्याने पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.07.05 15:51:10 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– ०५/०७/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2025.07.05 15:51:16 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद